| | |
|---|---|
| | दाखल दिनांक : १०/०७/२०१९ |
| | नोंदणी दिनांक : ११/०७/२०१९ |
| | निकाल दिनांक : १४/०५/२०२६ |
| | कालावधी : वर्ष, महिना, दिवस<br>०६ : १० : ०४ |

**<u>सावंतवाडी येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्या न्यायालयात</u>**

**ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग**

**(पीठासीन अधिकारी – श्रीमती आर. जी. कुंभार )**

(अधिघोषित दिनांक – १४/०५/२०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २७१/२०१९**

**निशाणी क्र. ५२**

| | |
|---|---|
| फिर्यादी<br>प्रस्तुतचा खटला हा आरोपीविरुध्द भारतीय चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये चालविण्यात आला. | कॅथॉलिक अर्बन को.ऑप क्रेडीट सोसा. लि<br>सावंतवाडी शाखा सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग<br>तर्फे शाखा व्यवस्थापक<br>श्री. मायकल डायगो आल्मेडा<br>वय सु. ४१ वर्षे, धंदा– नोकरी,<br>रा. जिमखाना, काजरकोंड,<br>ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग. |
| फिर्यादीतर्फे विधीज्ञ | श्री.एस. एस. राजगे |
| आरोपी | श्री. मयुराज वसंत शिर्के<br>वय सु. २८ वर्षे, धंदा– व्यापार,<br>रा. कोलगांव, चाफेआळी,<br>ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री. एस. के. मराठे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १२/०६/२०१९ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | --- |

| | |
|---|---|
| फिर्याद दाखल तारीख | ११/०७/२०१९ |
| गुन्ह्याचा दोषारोप नोंदवल्याची तारीख | १७/०२/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १९/१०/२०२४ |
| न्यायनिर्णय राखून ठेवण्याची तारीख | ---- |
| न्यायनिर्णय तारीख | १४/०५/२०२६ |
| शिक्षा सुनावल्याची तारीख, असल्यास | निरंक |

| आरोपीचा क्र. | आरोपीचे नाव | आरोपीच्या अटकेची तारीख | आरोपीची जामीनावर मुक्तता झाल्याची तारीख | आरोपी विरुध्द निश्चित करण्यात आलेले गुन्हे | आरोपीची निर्दोष मुक्तता अथवा दोषी ठरविण्यात आले | आरोपीस सुनावण्यात आलेली शिक्षा | कलम ४२८ फौजदारी प्रक्रिया संहिते नुसार संपरीक्षेच्या कालावधीमध्ये आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मयुराज वसंत शिर्के | निरंक | ०६/०३/२०२१ | परक्राम्य संलेख अधिनियम १८८१, कलम १३८ अन्वये | आरोपीस मुक्त करणेत येते | आरोपीस मुक्त करणेत येते. | निरंक |

## <u>-: न्यायनिर्णय :-</u>

( दिनांक १४ मे, २०२६ रोजी घोषित केला )

प्रस्तुतचा खटला हा वर नामे आरोपीविरुध्द भारतीय चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये चालविण्यात आला.

**थोडक्यात फिर्यादीचे कथन पुढीलप्रमाणे-**

२. फिर्यादी संस्था ही नोंदणीकृत संस्था असून तिचे प्रधान कार्यालय, गांधी चौक सावंवताडी येथे आहे. फिर्यादी संस्था ही समाजातील विविध गरजवंताना कर्ज वितरीत

करण्याचा कायदेशीर व्यवसाय करते. आरोपी हे गांव मौजे कोलगांव, चाफेआळी, ता. सावंतवाडी जि. सिंधुदुर्ग येथील रहिवासी असून त्यांनी फिर्यादी संस्थेकडून घर दुरुस्ती करीता दि.१३/११/२०१६ रोजी रक्कम रु.५०,०००/- (रक्कम रू. पन्नास हजार मात्र) इतकी कर्ज स्वरुपात उचल केलेली होती.

३. फिर्यादी यांचे पुढे असे कथन आहे की, आरोपीने सदर कर्जाच्या थकीत रक्कमेपोटी रक्कम रु.५७,३९७/- (रु.सत्तावन्न हजार तीनशे सत्याण्णव रुपये मात्र) इतक्या रक्कमेचा दि सारस्वत को.ऑप. बँक लि. शाखा सावंतवाडी, या बँकेचा धनादेश नं.०३७५४३ दि.०४/०५/२०१९ रोजी फिर्यादीस अदा केला. फिर्यादीने सदरचा धनादेश वटविण्याकरीता कॅनरा बँक, शाखा सावंतवाडी, ता. सावंतवाडी येथे जमा केला असता, सदरचा चेक आरोपीच्या खात्यामध्ये पुरेशी रक्कम नसल्याने धनादेश न वटता insufficient funds अशा शेऱ्यासह दि.०६/०५/२०१९ रोजी फिर्यादीस परत केला.

४. फिर्यादीचे पुढे असे कथन आहे की, आरोपीने जाणुनबजून कायदेशीर देय असलेली रक्कमेचा धनादेश देऊन फसवणूक केलेली आहे. त्यामुळे फिर्यादीने आपल्या वकीलांमार्फत दि.१७/०५/२०१९ रोजी आरोपीला रजिस्टर पोस्टामार्फत नोटीस पाठविली. सदरची नोटीस आरोपीला दि.२८/०५/२०१९ रोजी प्राप्त झाली. परंतु आरोपीने सदरची देय रक्कम फिर्यादीस मुदतीत अदा केलेली नाही. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द प्रस्तुतची तक्रार दाखल केलेली आहे व आरोपीला दंड व शिक्षा व्हावी अशी विनंती केली आहे.

५. आरोपीविरुध्द भारतीय चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये निशाणी क्र.१४ येथे आरोपीला त्यांचेविरुध्द ठेवणेत आलेला आरोपाचा आशय मराठीत समजावून सांगितला व त्याचे प्रतिकथन नोंदविले असता त्याने त्याचेवरील आरोप नाकारले

असून गुन्ह्याची संपरिक्षा घेण्याची विनंती केली.

६. आरोपीविरुध्द पुरेसा पुरावा आल्याने त्याचा फौ.प्र.स.कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नि.३९ येथे नोंदवणेत आलेला आहे.

७. फिर्यादीमार्फत सादर करण्यात आलेला पुरावा आणि या प्रकरणात आरोपीवर ठेवणेत आलेला दोषारोप याचा विचार करता खालील वादप्रश्न उपस्थित राहतात व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादातीत धनादेश हा आरोपीने फिर्यादीस त्याचे कायदेशीररित्या वसुल होणेयोग्य कर्ज अथवा इतर देणेपोटी दिलेला होता असे फिर्यादी शाबीत करतो काय ? | **नाही.** |
| २. | फिर्यादीने वादातीत धनादेश बँकेमध्ये वटविण्याकरीता जमा केलेनंतर तो funds insufficient या कारणास्तव अनादरीत झाल्याचे फिर्यादी शाबित करतो काय ? | **होय.** |
| ३. | सदरचे वादातीत धनादेश न वटता परत आलेनंतर फिर्यादीने विहीत मुदतीत आरोपीस धनादेशातील रक्कमेची मागणी करणारी नोटीस पाठविली व ती आरोपीस पोहोच झाली असे फिर्यादी शाबीत करतो काय ? | **होय.** |
| ४. | धनादेशामध्ये नमूद रकमेची मागणी नोटीस आरोपीला मिळूनही आरोपीने १५ दिवसांच्या आत धनादेशाची रक्कम फिर्यादीला अदा केली नाही असे फिर्यादी शाबीत करतो काय? | **होय.** |
| ५. | आरोपीने परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ कलम १३८ अन्वये गुन्हा केला असे फिर्यादी शाबित करतो काय ? | **नाही.** |
| ६. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**-:: कारणमिमांसा ::-**

८. याकामी फिर्यादीने आरोपीविरूध्द ठेवणेत आलेला आरोपाचा आशय शाबीत करण्याकरीता खालीलप्रमाणे साक्षीदार तपासलेला आहे.

**अ) फिर्यादीचे साक्षीदार :-**

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | मायकल डायगो आल्मेडा | फिर्यादी |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :-**

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :-**

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**फिर्यादी, बचावपक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ) फिर्यादी :-**

| अ.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | नि.क्र. १ | दि.१०/०७/२०१९ रोजीची फिर्याद. |
| २. | नि. क्र. २६ | फिर्यादीचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र |
| ३. | नि.क्र.२७/ सा.क्र.१ | दि.०४/०५/२०१९ रोजीचा धनादेश क्र.०३७५४३ रक्कम रुपये ५७,३९७/- (रु.सत्तावन्न हजार तीनशे सत्याण्णव मात्र) ची मुळ धनादेश प्रत. |
| ४. | नि.क्र.२८ | दि.०६/०५/२०१९ रोजीचा चेक रिटर्न मेमोची मुळ प्रत. |
| ५. | नि.क्र.२९ | आरोपी यास नोटीस पाठविलेची स्थळप्रत. |
| ६. | नि.क्र.३० | आरोपीला नोटीस पाठविलेल्या पोस्टाची पावती. |
| ७. | नि.क्र.३१ | आरोपी नोटीस पोहोच झालेची पोहोच पावती. |
| ८. | नि.क्र.३२ | फिर्यादी संस्थेचा संचालक मंडळाच्या सभेतील ठरावाची |

| | | |
|---|---|---|
| | | प्रत. |

**ब) बचाव पक्ष :-**

| **अनुक्रमांक** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन निशाणी :-**

| **अनुक्रमांक** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड) मुद्देमाल तपशील :-**

| **अनुक्रमांक** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

९. फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री. पी. जी. नाईक व आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एस. के. मराठे यांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र.२,३ व ४ करीताः</u>-**

१०. वरील दोन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची व तथ्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रीत चर्चेकरीता घेण्यात आलेले आहेत.

११. फिर्यादीतर्फे सा.क्र.१ मायकल डायगो आल्मेडा यांनी आपल्या सरतपासाचे प्रतिज्ञापत्रामध्ये फिर्यादमधील कथनांचा पुर्नरुच्चार केलेला आहे. त्यांच्या कथनांप्रमाणे फिर्यादी संस्था ठेवी स्वीकारणे, कर्ज देणे वगैरे व्यवसाय करीत असून त्यांचे प्रधान कार्यालय सावंतवाडी येथे आहे. सा.क्र.१ यांना दि.१६/०५/२०१९ रोजीच्या ठरावाने फिर्याद दाखल करण्याचा अधिकार दिलेले आहेत. आरोपीने फिर्यादी संस्थेकडून दि.१३/११/२०१४

रोजी घर दुरुस्ती करीता घेतलेल्या त्यांच्या कर्ज खाते क्र.ई-एल ८३३ असून, ती रक्कम परत न केल्याने थकीत राहिलेली आहे. आरोपीने आपला पुरावा स्वतंत्र नोंदविलेला नाही, परंतु, फिर्यादीच्या उलटतपासामध्ये गणपत माईनकर याच्या जामीन कामासाठी धनादेश व इतर कागदपत्रे घेतली होती, असा उत्तरसूचक प्रश्न विचारला आहे. याचाच अर्थ आरोपीने त्याचा धनादेश फिर्यादीचे ताब्यात दिला असल्याचे कबुल केलेले आहे. त्याबाबत, सदर धनादेशावरील सही आरोपीची नाही व सदरचा धनादेश आरोपीने दिला नाही, असे उत्तरसूचक विचारलेले प्रश्न फिर्यादीने नाकारले आहेत. तसेच, आरोपीने त्याच्या धनादेशाचा गैरवापर केल्याची तक्रार केलेली नाही. त्यामुळे, वादातीत धनादेश हा आरोपीचा असून त्यावरील सही आरोपीची आहे, असे गृहीतक निर्माण होते.

१२. फिर्यादीने सदरचा धनादेश वटविण्याकरीता कॅनरा बँक, शाखा सावंतवाडी, ता. सावंतवाडी येथे जमा केला असता, सदरचा चेक आरोपीच्या खात्यामध्ये पुरेशी रक्कम नसल्याने धनादेश न वटता insufficient funds अशा शेऱ्यासह दि.०६/०५/२०१९ रोजी फिर्यादीस परत केला. सदर कथनांच्या पुष्टयर्थ फिर्यादीने नि.२८ कडे कॅनरा बँक सावंतवाडी यांचेकडील दि. ०६/०५/२०१९ रोजीच्या बँक मेमोची मूळ प्रत हजर केलेली आहे. सदर बाबतीत आरोपीने फिर्यादीच्या उलटतपासामध्ये कोणताही बचाव घेतलेला नाही. सबब, वादातील धनादेश दि.१०/०५/२०१९ रोजी अनादरीत झाला ही बाब देखील शाबीत होत आहे.

१३. त्यानंतर फिर्यादी संस्थेने आरोपीस धनादेशाची रक्कम परतफेडीकरीता दि.१७/०५/२०१९ रोजी पाठविलेल्या नोटीसची कार्यालयीन प्रत हजर केलेली आहे. आरोपीने फिर्यादी संस्थेतर्फे नोटीस मिळाली नसल्याचा बचाव घेतलेला आहे. परंतु चलनक्षम दस्तऐवज कलम १३८ च्या परंतुकानुसार चेक अनादरीत झाल्यानंतर रक्कम मिळणेबाबतची

नोटीस आरोपीस त्याच्या पत्त्यावर पाठविणे अपेक्षीत आहे. फिर्यादी यांनी आरोपीची सूचित विधाने नाकारली असल्याने, आरोपीस परतफेडीबाबतची नोटीस मिळाली नाही, असे म्हणता येणार नाही. त्यामुळे सदरचा बचाव आरोपीस सहाय्यभूत नाही. सदरची नोटीस आरोपीच्या दिलेल्या पत्त्यावर पोहोच झाल्याचे नि.३१ कडील पोहोच पावतीवरुन दिसून येते. आरोपीने सदर पावती वरील पत्ता चुकीचा आहे, असा बचाव घेतलेला नाही. तसेच सदर पोहोच पावतीवरील सही त्याची नाही, असा देखील बचाव घेतला नाही. याचाच अर्थ नमूद पत्त्यावर पाठविलेली नोटिस आरोपीने स्वीकारलेली आहे, ही बाब शाबीत होत आहे. सदरची रक्कम फिर्यादी संस्थेस मुदतीत न मिळाल्याने संस्थेने दि.२९/०६/२०१९ रोजी प्रस्तुतची फिर्याद दाखल केलेली आहे.

१४. वादातील मूळ धनादेश व त्यावरील सही आरोपीने नाकारलेली आहे, तसेच, सदर धनादेशावर आरोपीचे नांव नाही, असेही त्याचे म्हणणे असले तरी त्याबाबत आरोपीने स्वतंत्र पुरावा दाखल केला नाही. परंतु वर नमूद केल्याप्रमाणे उलटतपासामध्ये सूचक प्रश्न विचारून धनादेश फिर्यादी संस्थेच्या ताब्यात दिल्याची बाब मान्य केली आहे. त्यामुळे चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ नुसार आरोपीने सदरचा धनादेश कायदेशीर देय असलेल्या रक्कमेपोटी दिला आहे, असे गृहीतक फिर्यादीचे वतीने निर्माण झाले आहे. निश्चितच सदरचे गृहीतक हे खंडन करण्यायोग्य आहे. त्यामुळे आरोपी फिर्यादी संस्थेचे कायदेशीर देणे लागत नसलेची बाब शाबीत करण्याची जबाबदारी आरोपीवर आहे. वर नमुद कथनांप्रमाणे आरोपीविरुध्द चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम ११८ व १३९ प्रमाणे गृहीतक लागू होते. **करीता मी मुद्दा क्र. २, ३ व ४ चे उत्तर होकारार्थी नोंदवत आहे.**

**<u>मुद्दा क्र. १ व ५ करीताः–</u>**

१५. वरील दोन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने पुराव्याची व तथ्यांची

पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रीत चर्चेकरीता घेण्यात आलेले आहेत.

१६. निश्चितच आरोपीला आपला बचाव शाबीत करण्याकरीता स्वतःचा पुरावा किंवा अन्य पुरावा देणेची आवश्यकता नाही. केवळ फिर्यादीच्या पुराव्यातील संभाव्यतेच्या तत्वावर त्याचा बचाव अभिलेखावर शाबीत करणे गरजेचे आहे. प्रस्तुत कामी आरोपीने स्वतःचा पुरावा नोंदविलेला नाही. त्यामुळे फिर्यादीच्या उलटतपासामध्ये आरोपीने घेतलेला बचाव पाहणे जरुरीचे आहे. आरोपीचा फिर्यादीच्या उलटतपासामधील संभाव्य बचाव व त्याची सचोटी पाहणे जरुरीचे आहे. फिर्यादीने आपल्या उलटतपासामध्ये, आरोपी त्यांचे संस्थेचा सभासद आहे, हे दर्शविणारा कागद हजर केला नाही, आरोपीने कर्ज मागणी केल्याचा कोणताही पुरावा हजर केला नाही, आरोपीने कर्ज मागणी केली व ती रक्कम त्याने स्वीकारली, हे दर्शविणारा कोणताही पुरावा सादर केला नही, कर्ज मागणी केलेस त्याबाबत ठराव मंजूर केला जातो, तसा ठराव मंजूर केल्याचा पुरावा दाखल केला नाही, आरोपीचा कर्ज खाते उतारा सदर कामी हजर केला नाही, इत्यादी मजकूर मान्य व कबूल केला आहे. फिर्यादीने पुढे, आरोपी रक्कम रुपये ५७,३९७/- इतकी देणे लागतो हे दाखविणारा पुरावा दाखल केला नाही, हे मान्य व कबूल केले आहे.

१७. एखाद्या व्यक्तीची कर्जाऊ रक्कम थकीत झालेस त्याला आम्ही नोटीस पाठवितो व मुदतीत पैसे न दिलेस वसूली घरी जाऊन करतो. वसूली न झालेस जामीनदार यांना नोटीस देतो व कलम १०१ ची कारवाई करतो, असे फिर्यादीने उलटतपासामध्ये मान्य केले आहे. तशी प्रक्रिया अवलंबल्याचा पुरावा सदरकामी दाखल केला नाही. निश्चितच ज्यावेळी आरोपी फिर्यादीचे कोणतेही कायदेशीर देणे लागत नाही, असा बचाव घेऊन त्याबाबत उलटतपासामध्ये कागदोपत्री पुरावा न सादर केलेबाबत अभिलेखावर आणतो, त्यावेळी कायदेशीर देणे लागत असलेचे शाबीत करण्याची जबाबदारी ही पुन्हा फिर्यादीवर

येते. प्रस्तूत केसमध्ये देखील आरोपीने फिर्यादीचे उलटतपासामध्ये कायदेशीर देणेबाबत पुरावा दाखल न केलेबाबत कथने अभिलेखावर आणलेली आहेत. त्यामुळे, धनादेशावर नमुद रक्कम आरोपी फिर्यादी संस्थेस कायदेशीर देणे लागतो, ही बाब फिर्यादी संस्थेने योग्य त्या पुराव्याने शाबीत करण्याची जबाबदारी reverse burden या तत्वाप्रमाणे फिर्यादीवर आहे. परंतु वर नमूद केल्याप्रमाणे आरोपी फिर्यादीचे कायदेशीर देणे लागतो हे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखवर न आलेने, आरोपीने फिर्यादी संस्थेकडून रक्कम कर्जाऊ घेतली होती व ती रक्कम थकीत राहिलेली आहे, हे शाबीत झाले नाही. परिणामत: वादातीत धनादेश कायदेशीर देणेपोटी फिर्यादी संस्थेस दिला याबाबत शंका निर्माण झाली आहे.

१८. सबब आरोपी धनादेशावरील नमूद रक्कम फिर्यादी संस्थेचे कायदेशीर देणे लागत असलेची बाब शाबीत करणेस फिर्यादी संस्था असमर्थ ठरली आहे. तसेच आरोपीने कायदेशीर रक्कम परतफेडीकरीता वादातील धनादेश फिर्यादी संस्थेस दिला ही बाब देखील शाबीत होत नाही. त्यामुळे आरोपी चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम ११८ व १३९ प्रमाणे असणाऱ्या गृहीतकांचे खंडण करण्यास यशस्वी ठरला आहे. **त्यामुळे मुद्दा क्र.१ व ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.**

**<u>मुद्दा क्र.६ करीताः–</u>**

१९. वरील सर्व मुद्दे क्र.१ ते ५ चे निष्कर्ष व त्याची कारणमिमांसा विचारात घेता मुद्दा क्र.२ ते ४ होकारार्थी नोंदविले असले तरी, वादातील धनादेशाप्रमाणे आरोपी फिर्यादी संस्थेस कायदेशीर देणे असलेची बाब शाबीत झालेली नसल्याने चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये आरोपीस शिक्षा करणेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व तात्वीक बाजुंची फिर्यादीने पुर्तता केली नाही, या निष्कर्षाप्रत मी आले आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त

होणेस पात्र आहे. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र. ६ चे उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-:: आ दे श ::-**

१. मयुराज वसंत शिर्के,वय सु. २८ वर्षे, धंदा- व्यापार, रा. कोलगांव, चाफेआळी, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग. यास चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये शिक्षापात्र गुन्ह्यात फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) निर्दोष मुक्त करणेत येत आहे.

२. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(ए) अन्वये आरोपीचे जामीन बंधपत्र आजपासून ६ महिने तसेच ठेवून त्यानंतर ते रद्द करण्यात येत आहे.

(खुल्या न्यायालयात घोषीत केले.)

KUMBHAR RANJANA GOVIND
Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2026.05.14 17:37:39 +0530

सावंतवाडी
दिनांक : १४/०५/२०२६

(श्रीमती आर. जी .कुंभार)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी
सावंतवाडी.